ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम

ग्रामीण नळ योजनांची विशेष दुरुस्ती व पुनर्वसन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
क्रमांक ग्रापापु १०२५/सीआर १०९५/ ३९-अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: ९ जानेवारी १९९६.

प्रस्तावना:

राज्यातील पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेवून सदर कार्यक्रम आणखी परिणामकारकरित्या राबविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे गरजेचे आहे, हे निश्चित करण्यासाठी व त्यानुसार धोरण ठरविण्यासाठी शासनाने पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढली होती. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, आतापर्यंत ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात नळ योजना हाती घेण्यात आल्या आहेत. परंतु योजनांची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन समाधानकारकपणे होत नाही. योजना पूर्ण झाल्यानंतर त्या चालविण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थावर सोपविण्यात आलेली आहे. योजनांच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनावर खर्च करण्यासाठी स्थानिक संस्थांना पुरेसा निधी उपलब्ध व्हावा, याकरिता स्थानिक जनतेवर पाणीपट्टी बसवून ती वसूल करण्याचे अधिकार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे योजनांच्या देखभाल व दुरुस्तीवरील खर्च भागविण्यासाठी प्रत्येक जिल्हा स्तरावर देखभाल व दुरुस्ती निधी स्थापन करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे उपाययोजना करुन देखील ग्रामीण नळ योजनांची देखभाल व दुरुस्ती योग्य प्रकारे होत नाही. अनेकदा नळ योजनांची विशेष दुरुस्ती करावी लागते, तर काही योजनांच्या बाबतीमध्ये योजनांचे पुर्नवसन करणे देखील गरजेचे असते. नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुर्नवसन या बाबी मोठ्या खर्चाच्या असल्यामुळे स्थानिक संस्थांना पुरेशा निधी अभावी त्या करणे शोपत नाहीत व त्यामुळे ब-याच योजना बंद स्थितीत राहतात. त्यामुळे मोठा भांडवली खर्च या कामासाठी होवूनही त्याचा उपयोग होत नाही व योजनेचे उद्दिष्ट सफल होत नाही. सदर बाब लक्षात घेता ग्रामीण नळ योजनांची विशेष दुरुस्ती व पुनर्वसन यांचा अंतर्भाव ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमात करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे. जिल्ह्यातील ज्या नळ योजना बंद आहेत, किंवा विशेष दुरुस्ती अभावी या योजनेत दोष असल्यामुळे पूर्णपणे कार्यरत नाहीत, अशा योजनांची विशेष दुरुस्ती किंवा पुनर्वसन ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाचा एक भाग म्हणून करण्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्देश देत आहे:-

[१] नळयोजनांची विशेष दुरुस्ती व पुनर्वसन यांत अंतर्भूत होणारी कामे:-
नळ योजनांची विशेष दुरुस्ती यात योजनेतील निकामी/नादुरुस्त झालेली पंपिंग मशिनरी बदलणे/दुरुस्त करणे किंवा योग्य त्या क्षमतेची पंपिंग मशिनरी नव्याने बसविणे, ऊर्ध्वनलिका/गुरुत्वनलिका इत्यादींमधील निकामी झालेली/फुटलेली पाईपलाईन बदलणे किंवा पुरेसा पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टिकोनातून योग्य व्यासाची पाईप लाईन टाकणे, साठवण टाकीची गळती दुरुस्ती करणे किंवा साठवण टाकीचे बळकटीकरण करणे किंवा योग्य दाबाने/पुरेसा पाणीपुरवठा होण्यासाठी नवीन साठवण टाकी बांधणे, वितरण व्यवस्थेतील निकामी झालेले पाईप बदलणे किंवा मोठ्या व्यासाचे पाईप टाकणे किंवा ज्या ठिकाणी वितरण व्यवस्था नाही, त्या ठिकाणी वितरण व्यवस्था टाकणे, उद्भवाचे पाणी कमी झाल्यास उद्भवाची खोली वाढविणे, किंवा इनवेल [उभे/आडवे]बोअर घेवून, उद्भवातील पाण्याचे प्रमाण वाढविणे किंवा नवीन उद्भव आवश्यक उपांगासह हाती घेणे, वितरण व्यवस्थेतील नळकोंडाळी दुरुस्त करणे किंवा नवीन नळ कोंडाळी बांधणे, ज्या ठिकाणी विद्युत दाबाची अडचण असेल त्या ठिकाणी स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसविणे इत्यादि कामे मोडतील. नळयोजनेचे पुनर्वसन करणे यात जुन्या योजनेतील काही उपांगे नादुरुस्त झाल्यामुळे त्यांची दुरुस्ती करणे किंवा नवीन उपांगे घेऊन योजना पूर्णपणे कार्यान्वित करणे इत्यादींचा समावेश होईल.

२] विशेष दुरुस्ती व पुनर्वसन करण्याकरिता करावयाची कार्यवाही:-

१] शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र. ग्रपापु १०९३/सीआर ८३१/३२-अ, दि. ११ जानेवारी, १९९४ अन्वये जिल्ह्यातील सर्व पूर्ण व कार्यान्वित पाणीपुरवठा साधनांचे नियमित सर्वेक्षण करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. सदर सर्वेक्षण दरवर्षी सर्वसाधारणपणे ऑक्टोबर महिन्यात करावयाचे असून सर्वेक्षणातील माहितीच्या आधारे तसेच त्यातील प्रपत्र [अ] व [ब] मधील माहितीचा विचार करुन कोणकोणत्या गावात/वाड्यात अस्तित्वात असलेल्या नळ योजनांची दुरुस्ती करुन पाणी पुरवठा चालू करता येईल हे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग यांच्याशी विचार विनिमय करुन ठरवावे.

२] त्यानंतर ज्या गावात/वाड्यात नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन करावयाचे आहे, त्याचा वार्षिक कृती आराखडा तयार करुन त्यास जिल्हा सुसूत्रीकरण व संनियंत्रण समितीची मान्यता घेण्यात यावी.

३] प्रथमत: नळ योजनांची विशेष दुरुस्ती/पुनर्वसन जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून होता येईल किंवा कसे हे पडताळून पाहण्यात यावे व जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत, निधी उपलब्ध असल्यास त्यातून कामे घेण्यात यावीत.

४] जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून जेवढ्या नळ योजनांची विशेष दुरुस्ती/पुनर्वसन करणे शक्य आहे, त्याचे नियोजन केल्यानंतर इतर नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसनाचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी विहित सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठवावीत. अशा प्रकारे प्रस्ताव पाठवितांना सदर काम जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून होणे जिल्हा परिषदेला निधी अभावी शक्य नाही व कामाचा अंतर्भाव टंचाई कृति आराखड्यात करण्यात आलेला नाही, असे प्रमाणपत्र सोबतच्या प्रपत्र "अ" प्रमाणे प्रस्तावासोबत जोडावे. संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीत सर्व मार्गांनी उपलब्ध होणारा निधी त्यातून करावयाची कामे, त्यांचा अंदाजित खर्च व टंचाई निवारणा या साठी उपलब्ध निधी यामधून सदरकाम होण्यास वाव नाही, याची सविस्तर माहिती घेतल्यानंतर व याची खात्री पटवून घेतल्यानंतर अशा दुरुस्तीच्या/पुनर्वसनाच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता द्यावी.

३] प्रस्ताव मंजूर करण्यासाठी पूर्तता करावयाच्या बाबी :-

नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसनाचे प्रस्ताव मंजूर करताना प्रस्तावासोबत खालील मुद्यांची पूर्तता झालेली आहे, किंवा कसे याकडे संबंधितांनी विशेष लक्ष द्यावे.

अ] संबंधित उप अभियंता, लघुसिंचन उपविभाग, जिल्हा परिषद/परिसर अभियांत्रिकी बांधकाम उपविभाग यांनी स्वत: निरीक्षण करुन द्यावयाचा स्थळ निरिक्षण अहवाल.

ब] विशेष दुरुस्तीची/पुनर्वसनाची सविस्तर अंदाजपत्रके [प्रस्तावातील प्रस्तावित खर्चवाजवी आहे किंवा कसे याबाबतची खात्री अंदाजपत्रकाची पडताळणी करुन करणे आवश्यक आहे.]

क] विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन कोणत्या परिस्थितीमुळे उद्भवली त्याची कारणमिमांसा देण्यात यावी. उदा. कामाच्या अंमलबजावणीमध्ये उणीवा होत्या किंवा कसे, योजनेच्या व्यवस्थापनेत हलगर्जीपणा इत्यादि.

ड] अशा प्रकारे विशेष दुरुस्ती किंवा योजनाचे पुनर्वसन करताना त्यावरील खर्च जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून करता येईल किंवा कसे, याबाबत सदर निधीतील शिल्लक रक्कमेच्या तपशिलासह स्पष्ट अभिप्राय देण्यात यावे.

इ] योजनेच्या विशेष दुरुस्तीचे काम टंचाई निवारण निधीतून होण्यास वाव नाही/टंचाई कृती आराखड्यात अंतर्भूत नाही.

४] प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देणारे सक्षम प्राधिकारी व काम करणाऱ्या यंत्रणा :-

नळ योजनांची विशेष दुरुस्ती/पुनर्वसनाबाबत प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार व कामे करणाऱ्या यंत्रणा यांचा तपशिल सोबतच्या प्रपत्र "ब" मध्ये देण्यात आलेला आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

५] <u>नळ योजनांची विशेष दुरुस्ती व पुनर्वसन यावर करावयाचा खर्च.</u>

वरील प्रमाणे नळ योजनांची विशेष दुरुस्ती वा पुनर्वसन यावर होणारा खर्च हा जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या राज्ययोजनांतर्गत नळ योजनेकरिता उपलब्ध असलेल्या तरतुदीतून करण्यात यावा व तो त्याकरीं जिल्ह्याकडे नळयोजनांसाठी उपलब्ध असलेल्या राज्य योजनांतर्गत तरतुदीच्या २०% पेक्षा जास्त असू नये.

६. वरील शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.प्र.क्र. ९१३/९५/व्यय-१५, दि. २.१.१९९६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[स्वाक्षरी]

[स. न. देशमुख]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. मंत्री/राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद[सर्व]
सदस्य सचिव, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळ, एक्सप्रेस टॉवर, नरीमन पॉईंट, मुंबई.
मुख्य अभियंता[ग्रामीण]महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ, प्रेस्टेज चेंबर्स, ४था मजला, १७५, डी. एन. रोड, मुंबई[७० अतिरिक्त प्रतींसह]संबंधित अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता यांना पाठविण्यासाठी,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र शासन, पी. एम. टी. बिल्डींग, स्वार गेट, पुणे.
भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे सर्व उपसंचालक, [प्रत्येकी ६ अतिरिक्त प्रतींसह त्यांच्या क्षेत्रातील वरिष्ठ भूवैज्ञानिकांना पाठविण्यासाठी]
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा[२५ अतिरिक्त प्रतींसह त्यांच्या क्षेत्रातील संबंधितांना पाठविण्यासाठी]
नियोजन विभाग,
वित्त विभाग,
नगरविकास विभाग,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग[जलसंधारण]
पाटबंधारे विभाग,
महसूल व पुनर्वसन विभाग,
संचालक, पी. पी. एम. ए. तथा उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
विशेष कार्य अधिकारी[श्री. माने], पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग/कार्यासने ३२, ३८, ३९, ४०, ४०-अ, ४०-ब, ४१, ४१-अ, ४१-ब, ४२, ४२-अ, व ४३,
निवड नस्ती, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, कार्यासन क्र. ३९-अ.

नि. रे. ९१

## प्रपत्र "ग"

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, मौजे                    तालुका
जिल्हा                    येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्ती/ पुनर्वसना काम कृति आराखड्यात समाविष्ट असून सदर काम " जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधी " तून निधी अभावी घेणे जिल्हा परिषदेस शक्य नाही तसेच सदर कामाचा उंचाई कृती आराखड्यात समावेश नाही. करीता सदर काम ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्य योजनांतर्गत नळ योजनांकरीता जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या तरतुदीतून घेण्यासाठी मंजूरी करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद

दिनांक :-

प्रपत्र "ब"

ग्रामीण नळ पाणी योजनांच्या विशेष दुरुस्ती/पुनर्वसना संदर्भात करावयाची प्रशासकीय मंजूरी व कार्यवाही करणाऱ्या यंत्रणा.

| अ.क्र. | नळ योजनेचा प्रकार | हस्तांतरीत/ अहस्तांतरीत | ज्या निधीतून कामे करावयाची आहेत त्याचा तपशिल | कामांस प्रशासकीय मंजूरी देणारे प्राधिकारी | कामे ज्या यंत्रणे मार्फत करावयाची आहे तिचे नाव. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | स्थानिकस्तर | हस्तांतरीत वा अहस्तांतरीत | १] जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | जिल्हा परिषद |
| | | | २] नळ योजनासाठी जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या राज्य योजनांतर्गत तरतुदीतून | जिल्हा परिषद [रुपये ५ लाखापर्यंत]<br>विभागीय आयुक्त [रु. ५ लक्षापेक्षा जास्त परंतु रु. १० लक्षापर्यंत] पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग [रु. १० लक्षापेक्षा जास्त] | जिल्हा परिषद |
| २ | राज्यस्तर | हस्तांतरीत | १] जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदेअंतर्गत सक्षम अधिकारी | जिल्हा परिषद |
| | | | २] नळ योजनासाठी जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या राज्य योजनांतर्गत तरतुदीतून | जिल्हा परिषद [रु. ५ लक्षापर्यंत]<br>विभागीय आयुक्त [रु. ५ लक्षापेक्षा जास्त परंतु रु. १०.०० लक्षापर्यंत]<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग [रु. १० लक्षापेक्षा जास्त] | जिल्हा परिषद |
| ३ | | अहस्तांतरीत | १] जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीतून | जिल्हा परिषदे अंतर्गत सक्षम अधिकारी | संबंधित परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग. |
| | | | २] नळ योजनासाठी जिल्ह्याकडे उपलब्ध असलेल्या राज्य योजनांतर्गत तरतुदीतून | जिल्हा परिषद रु. ५.०० लक्षापर्यंत<br>विभागीय आयुक्त [रु. ५ लक्षापेक्षा जास्त परंतु १०.०० लक्षापर्यंत]<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग [रु. १०.०० लक्षापेक्षा जास्त] | संबंधित परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग. |